**विशेष खटला क्र.०१/२०१८**

**नि.क्र.१०४**

<u>सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक ०५** यांची साक्ष</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव : **सोपान भोमा भाईक,**

वय सुमारे : ४४ वर्षे,

व्यवसाय : नोकरी, पोलीस निरीक्षक, भोईवाडा पोलीस स्टेशन, मुंबई

राहणार : मुंबई

---------

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री.एस.पी. हिवाळे सरकारी वकील.</u>**

१. दि.२८.०८.२०१७ रोजी मी लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, बुलडाणा येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी तक्रारदार राजू रामदास वाघ, रा. अंढेरा याने अंढेरा येथील तलाठी श्री.मदन जारवाल याचेविरूद्ध रू.२,०००/– रकमेची लाच मागितल्याबद्दल लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर मी सहाय्यक आयुक्त, (समाज कल्याण) यांना दोन पंच पुरविण्याबाबत पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१०५</u>** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने दोन पंच साक्षीदार नामे श्री. रवि काळवाघे व श्री.विष्णु कानडजे असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर झाले. मी पंच साक्षीदारांची तक्रारदारासोबत ओळख करुन दिली. तसेच माझीदेखील त्यांना ओळख करून दिली. तक्रारदाराची लेखी तक्रार ही पंच साक्षीदारांना अवलोकनार्थ देण्यात आली. तक्रारीमधील मजकूर वाचल्यानंतर पंच साक्षीदार क्र.१ याने तक्रारीच्या शेवटी शेरा लिहीला व त्याखाली सही केली. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास आधीच <u>निशाणी क्र.२५</u> देण्यात आली आहे.

२. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२८.०८.२०१७ रोजी पडताळणीपुर्व पंचनामा तयार करण्यात आला. पडताळणीपुर्व पंचनाम्यादरम्यान, मी पंच साक्षीदारांना तसेच तक्रारदाराला व्हाईस रेकॉर्डर, अल्ट्राव्हायोलेट लाईट आणि ॲन्थ्रासीन पावडरच्या वापराबाबत माहिती दिली. मी पंच साक्षीदारांना पुढे अशी माहिती दिली की, आरोपीची भेट घेण्यासाठी जातांना तक्रारदारासोबत पंच साक्षीदार क्र.१ श्री.कानडजे हे राहतील, तर

पंच साक्षीदार क्र.२ हे अन्य कर्मचारीसोबत राहतील. आरोपी मदन जारवाल याने तक्रारदाराच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी लाच रक्कम रू.२,०००/– ची मागणी केल्याबाबतची व्हाईस रेकॉर्डरद्वारे पडताळणी करण्याचे ठरले. मी सर्वांना सूचना दिल्या की, जर आरोपीने लाचेची मागणी केली, तर सापळा रचण्यात येईल. त्यानुसार पडताळणीपुर्व पंचनामा तयार करण्यात आला. आता मला सदरचा पडताळणीपुर्व पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन्ही पंच साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आधीच निशाणी क्र.३३ देण्यात आली आहे.

३. पडताळणीपुर्व पंचानामा तयार झाल्यानंतर, मी, दोन्ही पंच साक्षीदार, तक्रारदार आणि कर्मचारी असे सरकारी वाहनाने पडताळणीसाठी अंढेराकडे रवाना झालो. ते वाहन आरोपीच्या कार्यालयाजवळ कोणालाही दिसणार नाही अशा रितीने उभे केले. पडताळणीपूर्वी, मी पंच साक्षीदार क्र.१ कानडजे यास सुचना दिली की, त्याने तक्रारदारासोबत राहावे आणि आरोपी हा लाचेची मागणी करतो का हे काळजीपूर्वक ऐकण्याबाबत सूचना केली. त्याला पुढे अशी सूचना देण्यात आली होती की, जर आरोपीने त्याच्याबद्दल विचारले तर त्याने समर्पक उत्तरे द्यावीत. मी तक्रारदाराला व्हाईस रेकॉर्डर कोणालाही दिसणार नाही अशा प्रकारे शर्टाच्या आत लपवून ठेवण्यास सांगितले. पोलिस कॉन्स्टेबल विजय वारुळे यांनी ते व्हाईस रेकॉर्डर तक्रारदाराच्या शर्टाच्या आतमध्ये लावले आणि ते सुरु केले. मी त्यानंतर तक्रारदार आणि पंच साक्षीदार क्र.१ यांना पडताळणी झाल्यानंतर परत येण्याची सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार व पंच साक्षीदार क्र.१ यांना तलाठी कार्यालय येथे पाठविले.

४. सुचनेप्रमाणे पंच साक्षीदार क्र.१ आणि तक्रारदार हे तलाठी कार्यालय, अंढेरा येथे गेले. आरोपीने लाचेच्या मागणीची पडताळणी केल्यानंतर ते मोटारसायकलने परत आले. त्यावेळी पोलीस कॉन्स्टेबल विजय वारुळे यांनी तक्रारदाराच्या शर्टाच्या आत लावलेला व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर, मी पंच साक्षीदार क्र.१ यास आरोपीने मागणी केलेल्या लाचेच्या पडताळणीबाबत विचारणा केली. पंच साक्षीदार क्र.१ याने सांगितले की, आरोपी मदन जारवाल याने तक्रारदार याच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी रु.२,०००/– ची लाच तक्रारदाराला मागितली. आरोपी मदन जारवाल याचे सोबत असलेला कोतवाल भगवान ढोले यानेसुद्धा सांगितले की, आरोपी क्र.१ मदन जारवाल याने मागणी केल्याप्रमाणे तक्रारदाराने ती रक्कम त्याच्याकडे द्यावी. तथापी, आरोपी क्र.१ ने तक्रारदारला सांगितले की, ती रक्कम त्यादिवशी देऊ नका, दोन ते तीन दिवसानंतर आरोपी क्र.२ कडे द्या किंवा तो ती प्रत्यक्ष घेईल. त्यानंतर आम्ही

लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बुलडाणा येथे परत आलो. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डरमधील संपूर्ण संभाषण ऐकून त्याचे लिप्यंतर तयार केले. त्यांनतर पडताळणी पंचनामा तयार करण्यात आला. आता मला तो पडताळणी पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आधीच निशाणी क्र.३४ देण्यात आली आहे.

५. त्यानंतर, पोलीस कॉन्टेबल विजय वारुळे यांनी रेकॉडींगकरीता वापरण्यात आलेल्या मेमरीकार्डची हॅशव्हॅल्यु काढली, त्याचा स्क्रीनशॉर्ट काढला आणि त्यावर पंच साक्षीदारांची सही घेतली. मी सुध्दा त्यावर सही केली. आता मला सदरचा स्क्रीनशॉर्ट दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **'आर्टीकल जी'** देण्यात येत आहे.

६. त्यानंतर, मी तक्रारदाराला सूचना दिली की, जर आरोपीने त्याला संपर्क केला तर त्याने आम्हाला कळवावे. मी दोन्ही पंच साक्षीदारांना गोपनीयता पाळण्याची सुचना केली आणि बोलाविण्यात येईल तेव्हा हजर राहण्यास सांगितले.

७. दि.३१.०८.२०१७ रोजी तक्रारदाराने मला संपर्क केला आणि मला माहिती दिली की, तलाठी श्री.मदन जारवाल याने त्याला पैसे घेऊन भेटण्यासाठी बोलाविले. त्यानुसार मी दोन्ही पंच साक्षीदारांना लाचलुचपत कार्यालय, बुलडाणा येथे बोलाविले. त्यांनतर, दोन्ही पंच साक्षीदार लाचलुचपत कार्यालय, बुलडाणा येथे हजर झाले. मी त्यांना सापळ्याच्या कार्यपद्धतीबाबत सूचना दिल्या. मी तक्रारदाराला चिखली येथील विश्रामगृहाजवळ बोलाविले. त्यांनतर, मी, पंच साक्षीदार आणि कर्मचारी यांच्यासह सापळा कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्य घेऊन चिखली विश्रामगृहाकडे गेलो. सदर विश्रामगृहामध्ये एक रुम मिळण्याकरीता मी पत्र दिले. तक्रारदाराने सापळ्यामध्ये लाच म्हणून वापरली जाणारी रक्कम आणलेली होती. त्या रकमेमध्ये पाचशे रूपयेच्या चार चलनी नोटा असे एकूण रू.२,०००/– होते. त्या चलनी नोटांचे क्रमांक नोंदवून घेण्यात आले. मी दोन्ही पंच साक्षीदारांना आणि तक्रारदाराला ॲन्थ्रासीन पावडरच्या वापराबाबत प्रात्यक्षीक करुन दाखविले. पोलीस कॉन्स्टेबल पवार यांनी एका कोऱ्या पांढऱ्या कागदावर ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यांनतर, ॲन्थ्रासीन पावडर अल्ट्राव्हायलेट लाईटखाली तपासली असता त्या कोऱ्या कागदावर तसेच पोलीस कॉन्स्टेबल पवार यांच्या बोटांवर देखील हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर, तक्रारदाराने आणलेल्या पाचशे रुपये दराच्या चार चलनी नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. त्यानंतर सदर नोटा ह्या तक्रारदाराच्या शर्टाच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर

तक्रारदार व पंच साक्षीदार क्र.१ यांना कार्यपद्धतीबाबत सुचना देण्यात आल्या. या सर्व गोष्टींचा सापळापूर्व पंचनामा तयार करण्यात आला. आता मला तो सापळापूर्व पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंच साक्षीदारांची सही आहे. त्यास आधीच निशाणी क्र.३५ देण्यात आलेली आहे.

८. त्यानंतर मी, पंच साक्षीदार, तक्रारदार आणि कर्मचारी असे अंढेरा या गावी गेलो. तक्रारदार व पोलीस कॉन्स्टेबल विजय वारुळे हे मोटार सायकलने तेथे गेले. पोलीस कॉन्स्टेबल पवार यांना चिखली विश्रामगृह येथे थांबण्यास सांगितले.

९. त्यांनतर अंढेरा फाट्यावर पोलीस कॉन्स्टेबल विजय वारुळे यांनी तक्रारदाराच्या शर्टाच्या आतील बाजूस व्हाईस रेकॉर्डर लावला. मी तक्रारदाराला महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यानंतर, पंच साक्षीदार क्र.१ व तक्रारदार हे आरोपीला भेटण्याकरीता अंढेरा येथील तलाठी कार्यालयात गेले. तक्रारदार व पंच साक्षीदार क्र.१ हे त्याठिकाणी बराच वेळ थांबले. आरोपी मदन जारवाल याने पंच साक्षीदार क्र.१ व तक्रारदार यांना इशारा करून एका तासाने परत येण्यास सांगितले. त्यानंतर ते आमच्याकडे परत आले. एक तासानंतर पुन्हा सापळा रचण्याचे ठरले. त्यानंतर पंच साक्षीदार क्र.१ आणि तक्रारदार यांना पुन्हा आरोपीला भेटण्यासाठी तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले. आम्ही तलाठी कार्यालयाच्या आसपास कोणालाही न दिसता तक्रारदाराच्या इशाऱ्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर तक्रारदार आणि पंच साक्षीदार क्र.१ हे इशारा न करता बाहेर आले व अंढेरा फाट्याकडे निघून गेले. आम्हीसुध्दा त्यांच्या पाठोपाठ अंढेरा फाट्याकडे गेलो. पोलिस कॉन्स्टेबल विजय वारुळे यांनी तक्रारदाराच्या शर्टाच्या आत लपविलेला व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यांनतर पंच साक्षीदार क्र.१ यांनी सांगितले की, आरोपी मदन जारवाल याने संशय आल्यामुळे लाचेची रक्कम स्वीकारली नाही.

१०. त्यानंतर आम्ही विश्रामगृह, चिखली येथे परत आलो. त्याठिकाणी मी तक्रारदार याचा जबाब नोंदविला. व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषणाची अनुलीपी तयार करण्यात आली. त्यानंतर आम्ही सापळा पंचनामा तयार केला. आता मला सदरचा सापळा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व दोन्ही पंच साक्षीदारांची सही आहे. त्यास आधीच निशाणी क्र.३६ देण्यात आलेली आहे.

११. त्यानंतर सापळ्यासाठी वापरण्यात आलेल्या चलनी नोटा जप्त करण्यात आल्या. त्यानंतर लाच रकमेची मागणी केल्याबद्दल आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

करण्यासाठी मी अंढेरा पोलिस स्टेशनला एक पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१०६** देण्यात येत आहे.

**१२.** त्यानंतर मी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१०७** देण्यात येत आहे. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१०८** देण्यात येत आहे.

**१३.** त्यानंतर दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. आता मला अटक पंचनामे दाखविण्यात आला. ते तेच आहेत. त्यावर माझी, आरोपींची व दोन पंच साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना **निशाणी क्र.१०९ व ११०** देण्यात येत आहे.

**१४.** त्यानंतर मी दोन्ही आरोपींचे नैसर्गिक आवाजाचे नमुने घेतले व पंचनामे तयार केले. त्यांना आधीच निशाणी क्र.३८ व ३९ देण्यात आलेले आहे.

**१५.** दि.०४.०९.२०१७ रोजी मी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना आरोपींच्या सेवेसंबंधी माहिती मिळण्याकरीता पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.१११** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांनी प्रत्युत्तर पत्र पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यास **निशाणी क्र.११२** देण्यात येत आहे.

**१६.** दि.१८.०९.२०१७ रोजी मी तहसिलदार, देऊळगाव राजा यांना घटनास्थळाचा नकाशा प्राप्त करण्याकरीता पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आधीच निशाणी क्र.९० देण्यात आले आहे. त्यानुसार मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळाचा नकाशा तयार केला आणि त्याच्या पत्रासोबत तो पाठविला. आता मला ते पत्र व घटनास्थळाचा नकाशा दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यांना आधीच निशाणी क्र.९१ व ९२ देण्यात आलेले आहे.

**१७.** दि.२६.०९.२०१७ रोजी मी दोन्ही आरोपींचे नैसर्गिक आवाजाचे नमुने

असलेले दोन मेमरी कार्ड स्पेक्ट्रोग्राफी टेस्ट करण्यासाठी आणि त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त करण्यासाठी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अमरावती यांच्यामार्फत पत्राद्वारे न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती यांचेकडे पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.११३</u>** देण्यात येत आहे. तपासादरम्यान मी पोलीस कॉन्स्टेबल विजय वारुळे यांचेकडून व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केलेल्या संभाषणाबाबतचे भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५–ब चे प्रमाणपत्र प्राप्त केले. आता मला ते प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यास **<u>निशाणी क्र.११४</u>** देण्यात येत आहे.

**१८.** त्यानंतर मला न्यायवैज्ञानीक प्रयोगशाळा, अमरावती यांचेकडून अहवाल प्राप्त झाला. आता मला तो अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर वैज्ञानिक अधिकारी यांची सही व शिक्का आहे. त्यास **<u>निशाणी क्र.११५</u>** देण्यात येत आहे.

**१९.** दि.२०.०१.२०१८ रोजी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अमरावती यांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना आरोपीविरुध्द खटला चालविण्यासाठी पत्र दिले. त्या पत्रास अगोदरच <u>निशाणी क्र.५२</u> देण्यात आले आहे.

**२०.** तपासादरम्यान मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. दि.१०.११.२०१७ रोजी मी तक्रारदाराला लाच रकमेच्या बदल्यात नुकसान भरपाई म्हणून रू.२,०००/– चा धनादेश दिला व त्याच्याकडून त्याबाबतची पावती घेतली. आता मला ती पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व तक्रारदाराची सही आहे. त्यास **<u>निशाणी क्र.११६</u>** देण्यात येत आहे.

**२१.** तपास पूर्ण झाल्यानंतर मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**२२.** आजरोजी दोन्ही आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.डी. रूनवाल यांचेमार्फत सुरू.</u>

**२३.** तक्रारदार हा वाळू वाहतुकीचा व्यवसाय करत होता. मी तक्रारदाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत कोणताही तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार हा अवैध वाळू वाहतूक व्यवसाय करीत होता. हे मी सांगू शकत नाही की, आरोपी क्र.१ ने तक्रारदारावर अवैध वाळू वाहतुकीसंबंधात दंड आकारला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे

नाही की, तक्रारदाराच्या अवैध वाळू वाहतूकीच्या व्यवसायाला अडथळा येऊ नये म्हणून मी तक्रारदारासोबत संगनमत करुन आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणूनबुजून तक्रारदाराच्या व्यावसायिक उपक्रमांबद्दल चौकशी केली नाही.

**२४.** तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार आरोपी क्र. १ ने दि.२५.०८.२०१७ रोजी लाचेची मागणी केली. तक्रारदाराने दि.२८.०८.२०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाला तक्रार दिली. मी तक्रारदाराकडून तक्रार दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबतचे स्पष्टीकरण घेतले. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने तक्रार दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण दिले नाही. मी तक्रारदाराकडून त्याने तथाकथीत दिलेली रक्कम रुपये २०००/– जप्त केलेली नाही. तक्रारदाराने तथाकथीत दिलेली लाचेची रक्कम रु.२,०००/– चे विवरण मी घेतले नाही व त्यासंबंधी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०८.२०१७ रोजी आरोपी क्र.१ याने तक्रारदाराकडून कोणतीही रक्कम मागितली नाही किंवा स्वीकारली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०८.२०१७ रोजी आरोपी क्र.१ याने तक्रारदाराकडे उर्वरीत रक्कम रु.२,०००/– मागितली नव्हती.

**२५.** दि.०४.१०.२०१७ ते दि.२३.१०.२०१७ पर्यंत मेमरीकार्ड हे माझ्या कार्यालयामध्येच होते. सदरचा मुद्देमाल हा मुद्देमाल कक्षामध्ये मुद्देमाल मोहरर पोलीस कॉन्स्टेबल शाम भांगे याचेकडे जमा करण्यात आला होता. पोलीस कॉन्स्टेबल शाम भांगे यांचेडून ते मेमरीकार्ड पुन्हा माझ्या ताब्यात घेतलेबाबतचे दस्तऐवज मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, न्यायवैज्ञानीक प्रयोगशाळेकडून आलेला अहवाल हा सरकार पक्षाच्या बाजुने नाही. दि.३०.१२.२०१७ रोजीचा न्यायवैज्ञानीक प्रयोगशाळा, अमरावती यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर मी पुन्हा दुसऱ्या न्यायवैज्ञानीक प्रयोगशाळेकडे ते मेमरीकार्ड दुसऱ्या अभिप्रायाकरीता पाठविले नाही. मला दुसऱ्या न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे ते मेमरीकार्ड पाठविण्याची गरज वाटली नाही.

**२६.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीस कॉन्स्टेबल वारुळे यांनी आरोपी व तक्रारदार यांच्या नैसर्गिक आवाजांच्या नमुन्याकरीता भारतीय पुरावा कायदा,१८७२ चे कलम ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०८.२०१७ व दि.३१.०८.२०१७ रोजी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केलेले तथाकथित लाचेच्या मागणी व स्वीकारण्यासंदर्भात झालेल्या संभाषणाबाबत पोलीस

कॉन्स्टेबल वारुळे किंवा मी भारतीय पुरावा कायदा,१८७२ चे कलम ६५(ब) चे प्रमाणपत्र दिलेले नाही. हे खरे आहे की, निशाणी क्र.११४ मध्ये मेमरीकार्ड व व्हाईस रेकॉर्डरच्या कंपनीचे नांव आणि मॉडेलचे नांव यांचा उल्लेख नमूद नाही.

**२७.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही लाचेची मागणी केली नाही अथवा स्वीकारली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा आवाज व्हॉईस रेकॉर्डरध्ये तसेच मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी व तक्रारदार यांचे नैसर्गिक आवाजाचे नमुने ध्वनीमुद्रीत केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे व बनावट दोषारोपपत्र, दस्तऐवज आणि पंचनामे तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात नमुद केल्याप्रमाणे तसेच सर्व पंचनाम्यामध्ये नमूद केलेल्या तारखांना व ठिकाणी अशा कोणत्याही घटना घडलेल्या नाहीत.

**२८.** उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना आरोपींविरुध्द खटला दाखल करण्यासाठी मंजुरी देण्याचा अधिकार आहे हे दर्शविणारी कागदपत्रे मी हस्तगत करुन दाखल केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना आरोपींविरुध्द खटला दाखल करण्यासाठी मंजुरी देण्याचा अधिकार नाही.

**२९.** हे मला आठवत नाही की, मंजूरी आदेश प्राप्त करण्यापूर्वी मी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेकडे मुळ कागदपत्रे किंवा छायांकित प्रती पाठविले होते किंवा नाही. मी संभाषण ध्वनीमुद्रीत असलेले मेमरीकार्ड उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेकडे पाठविलेले नव्हते. हे खरे आहे की, दोषारोपपत्र दाखल करतेवेळी निशाणी क्र.३८ सोबत असलेली सी.डी. न्यायालयात जमा करण्यात आलेली नाही. सदरची सी.डी. का जमा करण्यात आली नव्हती, याचे कारण मी सांगू शकत नाही.

**३०.** दि.३१.०८.२०१७ रोजीच्या सापळा पंचनाम्याप्रमाणे कोतवाल परमेश्वर राठोड याने तक्रारदाराला फोन करुन कळविले की, आरोपी जारवाल याने तक्रारदाराला तलाठी कार्यालयात रक्कम रू.२,०००/– घेऊन बोलाविले आहे. मी कोतवाल परमेश्वर राठोड यांचा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने स्वेच्छेने त्याचे निवेदन दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणे व माझ्या दबावामुळे आरोपीने त्याचे निवेदन दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुद्ध खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**३१.** मी परमेश्वर राठोड यांच्या नैसर्गिक आवाजाचा नमुना घेतलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१.०८.२०१७ रोजी आरोपी क्र.२ भगवान ढोले हा घटनास्थळी नव्हता, त्यामुळे त्याचा आवाज ध्वनीमुद्रीत झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही मेमरीकार्डमध्ये कोणत्याही आरोपीच्या आवाजाचे ध्वनीमुद्रण नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

वाचुन दाखविले व बरोबर असल्याचे कबुल केले.

समक्ष,

Digitally signed by ROKADE RAHUL NAGNATH
Date: 2025.11.25 13:19:36 +0530

(**आर.एन. रोकडे** )

दिनांकः १८.०९.२०२५ सत्र न्यायाधीश, बुलडाणा.

...